# प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा निम्नश्रेणी व उच्चश्रेणी परीक्षा रविवार, २१ डिसेंबर, २०२५ रोजी मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्रे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत या कार्यालयांच्या संबंधित विभागीय कार्यालयांकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **मुंबई व कोकण विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>कोकण विभाग, कोकण भवन, तिसरा मजला,<br>नवी मुंबई - ४०० ६१४.<br>दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७३५४२. | **पुणे व नाशिक विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला,<br>पुणे - ४११ ००१.<br>दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२१७०९. |
| **नागपूर व अमरावती विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>प्रशासकीय इमारत,दुसरा मजला, सिव्हिल लाईन्स,<br>नागपूर - ४४० ००१.<br>दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६४९५६. | **छत्रपती संभाजीनगर विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>छत्रपती संभाजीनगर विभाग,<br>जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर,<br>छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००१.<br>दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३६१३७२. |

अराजपत्रित कर्मचारी व राजपत्रित अधिकाऱ्यांची माहे डिसेंबर २०२५ मधील हिंदी भाषा निम्नश्रेणी परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र. १) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या सुधारित अभ्यासक्रमाचे इयत्ता १० वी साठी निश्चित केलेले "लोकभारती (द्वितीय भाषा)" या पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. हिंदी भाषा उच्चश्रेणी परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र. १) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचे इयत्ता १० वी साठी मार्च-एप्रिल, २०१८ मध्ये निश्चित केलेले "कुमारभारती (प्रथम भाषा)" या पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका क्र. २ च्या अभ्यासक्रमात कोणताही बदल नाही.

परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी सदर आवेदनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव, कार्यालयाचा पूर्ण पत्ता, (पिन कोड क्रमांकासह) व भ्रमणध्वनी क्रमांकासह आवेदनपत्र परिपूर्ण भरुन मूळ चलनासह संबंधित कार्यालयाकडे उपरोक्त नमूद केलेल्या तारखेपूर्वी पाठविणे आवश्यक आहे. भाषा संचालनालयाचे संकेतस्थळ directorate.marathi.gov.in असे असून भाषा संचालनालयाच्या परीक्षेसंबंधीची व परीक्षा शुल्कासंबंधीची सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच उपरोक्त परीक्षांची कार्यक्रमपत्रिका व प्रवेशपत्र संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी प्रसिध्द करण्यात येईल.

भाषा संचालक
महाराष्ट्र राज्य,

मुंबई
दिनांक : ९।८।२०२५